CNR No.MHLA060012802022

| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : - | २५.०४.२०२२ |
| नोंदणी दिनांक | : - | २७.०४.२०२२ |
| निकाल दिनांक | : - | २०.०७.२०२६ |
| कालावधी | :- | वर्षे महिने दिवस<br>०४ ०२ २५ |

**अहमदपूर, ता.अहमदपूर, जि. लातूर येथील न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,**
**न्यायालय क्र.२ अहमदपूर, यांचे न्यायालयात.**
**( पिठासीन अधिकारी - मेघा सी. हासगे )**

**म. सं. कौ. का. अर्ज क्र. १६/२०२२** **न्यायनिर्णय नि.क्र.२२**

१. रिजवाना भ्र. मिनाज पटेल,
वय ३५ वर्षे, धंदा - घरकाम,
२. फैजान पि. मिनाज पटेल,
वय १४ वर्ष धंदा - अज्ञान,
३. इमरान पि. मिनाज पटेल,
वय १२ वर्ष धंदा - अज्ञान,
४. उमान पि. मिनाज पटेल,
वय ०९ वर्ष धंदा - अज्ञान,
अर्जदार नं.२ ते ४ अ.पा.क. सख्खी आई अर्जदार नं.१
सर्व रा. भाग्यनगर, अहमदपूर, ता. अहमदपूर जि.लातूर

......**अर्जदार.**

**विरुध्द**

१. मिनाज पि. अहेमद पटेल,
वय ४० वर्षे, धंदा - व्यापार,
२. तैयबा भ्र. अहेमद पटेल,
वय ६० वर्षे, धंदा - घरकाम,
३. फारुख पि. अहेमद पटेल,
वय ३८ वर्षे, धंदा - व्यापार,

४. रियाज पि. अहेमद पटेल,
वय ३६ वर्ष धंदा - व्यापार,
५. फेरोज पि. अहेमद पटेल,
वय ३४ वर्ष धंदा - व्यापार,
६. मुमताज अहमद पटेल,
वय ३५ वर्ष धंदा - घरकाम,
सर्व रा. डेल फार्म, रईस मील जवळ,
निजामाबाद ता.जि. निजामाबाद. .....**गैरअर्जदार.**

**उपस्थिती :**

---

| | | |
|---|---|---|
| अर्जदारांतर्फे | : | श्री. व्ही. बी. मुसने विधीज्ञ |
| गैरअर्जदारांतर्फे | : | श्री. डी. एम. कांबळे विधीज्ञ |

---

**न्या य नि र्ण य**

(दि.१५ जुलै, २०२६ रोजी घोषित)

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार हिने कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ चे कलम १२, १८, १९, २०, २२ मधील तरतुदीनुसार दाखल केला आहे.

अर्जदाराचे अर्जातील थोडक्यात कथन खालील प्रमाणे;

०२. अर्जदार नं.१ हीचे कथन असे आहे की, अर्जदार क्र. ०१ ही गैरअर्जदार क्र. ०१ ची पत्नी असुन, त्यांचे लग्न दिनांक २०/०४/२००६ रोजी मुस्लीम रितीरिवाजाप्रमाणे निजामाबाद, ता.व जि. निजामाबाद येथे पार पडले. त्या दोघांचे वैवाहीक नाते अद्यापही कायम आहेत. अर्जदार क्र. ०१ हिस गैरअर्जदार क्र. ०१ पासुन तीन मुले अनुक्रमे अर्जदार क्र. ०२ फैजान, अर्जदार क्र. ०३ इमरान व अर्जदार क्र. ०४ उमान हे झाले आहेत. गैरअर्जदार क्र. ०२ ही अर्जदार क्र. ०१ ची सा्ु आहे तर अर्जदार क्र. ०३ ते ०६ हे अर्जदार क्र. ०१ चे दिर असुन गैरअर्जदार क्र. ०७ ही अर्जदार क्र. ०१ ची नणंद आहे. लग्न झाल्यानंतर अर्जदार क्र. ०१ ही गैरअर्जदार क्र. ०१ सोबत नांदावयास त्यांच्या राहत्या घरी निजामाबाद येथे गेली.

०३. अर्जदार क्र. ०१ ने पुढे असे कथन केले की, लग्न झाल्यानंतर गैरअर्जदार क्र.

०१ ते ०७ यांनी अर्जदारस कसे तरी एक वर्ष चांगले नांदविले. त्यानंतर अर्जदार क्र. ०१ हिस गैरअर्जदार क्र. ०१ ते ०७ यांनी तुझ्या माहेरच्यांनी लग्नामध्ये आमचे मानपान केले नाही, तु वागायला चांगली नाहीस, तु आमच्या खानदानाचे बरोबरीची नाहीस, म्हणुन अर्जदार क्र. ०१ हिचे चारित्र्यावर संशय घेऊन वरील सर्व गैरअर्जदार हे अर्जदारस लाथाबुक्यांनी, बेल्टने मारहाण करुन उपाशी पोटी ठेवत असत. तसेच अर्जदार क्र. १ ही ०३ महिण्याची गरोदर असताना तिचा जबरदस्तीने गर्भपात केला. तसेच गैरअर्जदार क्र. ०१ ते ०७ हे अर्जदारास माहेरहुन ट्रान्सपोर्टचा व्यवसाय टाकणेसाठी रुपये १०,००,०००/-रुपये माहेरहुन घेऊन ये, म्हणुन सतत छळ करीत असत. त्यांची मागणी पुर्ण न केल्यामुळे अर्जदार क्र. ०१ हिला गैरअर्जदार हयांनी त्रास, छळ व जाचजुलुम करुन डिसेंबर २००७ मध्ये तिला मारहाण करुन तिचे अंगावरील पाच तोळे सोन्याचे दागिने काढुन घेऊन घरातुन हाकलुन दिले. तेंव्हा पासुन अर्जदार ही तिचे आई वडिलांकडे अहमदपूर येथे राहत आहे. अर्जदार ही अहमदपूर येथे आई वडीलांकडे असताना, एक महिण्याचे गैरअर्जदार क्र. ०१ तिच्या माहेरी आला आणि त्याला सौदी अरेबियाला जाण्यासाठी लागणारा खर्च दिल्यास ते अर्जदाराला तलाक देणार नाही, असे म्हणाले. करीता अर्जदाराच्या आई वडीलांनी त्याला जाण्याच खर्च दिला.

०४. अर्जदार क्र. ०१ ने पुढे असे कथन केले की, गैरअर्जदार क्र. ०१ हा सौदी अरेबियाला होता, तेंव्हा अर्जदार क्र. ०१ ते ०४ यांचे उपजिविकेसाठी व पालन पोषणासाठी दरमहा रुपये १५,०००/- अर्जदार क्र. ०१ हिचे खातेवर सन २०१७ पर्यंत पाठवत होता. त्यानंतर गैरअर्जदार क्र. ०१ हा सौदी अरेबियाला गेलेला नाही व तो अहमदपूर येथे सुध्दा अर्जदार क्र. ०१ सोबत राहिलेला नाही. तसेच अर्जदार क्र. ०१ ते ०४ यांच्या पालन पोषणाचा खर्च सुध्दा देत नाही. म्हणुन फेब्रुवारी २०२१ मध्ये गैरअर्जदारांना त्याबाबत बैठकीसाठी अहमदपूर येथे बोलावले. सदर बैठकीमध्ये अर्जदार क्र. ०१ ते ०४ यांचे उपजिविकेचा व पालनपोषणाचा तसेच अज्ञान अर्जदारांच्या शिक्षणाचा खर्च करण्याबद्दल विचारणा केली असता, गैरअर्जदारांनी त्यांच खर्च करणेस नकार दिला. गैरअर्जदार क्र. ०१ यांचे निजामाबाद येथे ट्रान्सपोर्टचा व्यवसाय असुन त्यांच्याकडे ४ ट्रक, शेती आणि खुले प्लॉट आहेत. त्यातुन त्याला दरमहा ३ लाख रुपये उत्पन्न मिळते व तो अर्जदारास ५,०००/- रुपये प्रत्येकी अंतरीम खावटी देऊ शकतो. अर्जदारांचा उदरनिर्वाह व उपजिवीकेसाठी उत्पन्नाचे साधन नसल्यामुळे तिने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

०५. गैरअर्जदार क्र. १, २, ४ व ७ तर्फे (निशाणी क्र.१५) कडे म्हणणे दाखल करुन अर्जदाराचे सगळे म्हणणे नाकारले आहे. गैरअर्जदारांना, गैरअर्जदार क्र. ०१ व अर्जदार यांचे लग्न व त्यातुन जन्माला आलेले मुले हे मान्य आहेत. ते दोघेही विभक्त राहतात ही बाब देखील मान्य केली आहे.

०६. गैरअर्जदारांच्या कथनाप्रमाणे गैरअर्जदार क्र. ०१ यांचे अर्जदार क्र. ०१ हिच्याशी लग्न झाल्यापासुन तो अहमदपूर येथे राहत होता व कामधंदा करीत होता. त्यांने स्वत:च्या मेहनतीने अहमदपूर येथे प्लॉट खरेदी केला होता व बांधकाम करुन त्यांचा आनंदाने संसार चालु होता. त्याने कधीच अर्जदार क्र. ०१ हिला मानसिक, शारीरिक त्रास दिला नाही. सौदी अरेबियाला कामाकरीता गेला, त्या काळात त्याने एकुण रक्कम रुपये १५,५६,७२६/- एवढी अर्जदार क्र. ०१ हिच्या नावे बँकेत खात्यावर पाठविली. परंतु ते सर्व पैसे अर्जदाराने व तिच्या आई वडीलांनी मिळुन खर्च केले. गैरअर्जदार क्र. ०१ हा भारतात राहण्यासाठी आला तेंव्हा अर्जदार हिने तिच्या आई वडीलांच्या सांगण्यावरुन गैरअर्जदाराचा अपमान करणे, उलटे बोलणे असा त्रास देण्यास सुरुवात केली व अर्जदाराच्या आई वडील व भावांनी गैरअर्जदार क्र. ०१ यास त्याने बांधलेल्या घरातुन हाकलुन दिले. त्यांच्यावर कलम ४९८(अ) खाली खोटा गुन्हा दाखल केला.

०७. गैरअर्जदार क्र. ०१ याचा ट्रान्सपोर्टचा कसल्याही प्रकारचा उद्योग नाही, त्याच्या नावे शेती नाही, खुले प्लॉट नाही. गैरअर्जदार क्र. ०१ हा सध्या हालाकीचे जीवन जगत असुन मोल मजुरी करुन दिवस काढत आहे. त्याला महिण्याला ४,०००/- ते ५,०००/- मिळवणी व पोटाची खळगी भरणे दुरापास्त झाले आहे. याउलट अर्जदार ही घरामध्ये किराणा दुकानाचा व्यवसाय व कपडे शिलाईची मशिन चालविते आणि प्लॉट मधील ४ रुम भाडयाने देऊन महिण्याला ८,०००/- ते १०,०००/- घरभाडे येते. अशाप्रकारे ती आपल्या ३ मुलांसह आनंदाचे जिवन व्यथीत करत आहे आणि तिला कोणतीही पोटगीची आवश्यकता नाही. तो आजही अर्जदारास नांदविण्यास तयार आहे.

०८. अर्जदारातर्फे ॲड श्री व्ही.बी. मुसने यांचा युक्तीवाद ऐकला. गैरअर्जदाराचे वकिल डी. एम. कांबळे यांनी त्यांचे म्हणणे दाखल केल्यानंतर अर्जदाराच्या तसेच साक्षीदारांच्या उलटतपासणीकरीता आलेले नाहीत तसेच त्यांनी त्यांच्या पक्षामध्ये कोणताही पुरावा सादर केला नाही. अर्जाचे व पुराव्याचे अवलोक केले त्यावरुन खालील वादप्रश्न

उपस्थित झाले असुन त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अनु क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | गैरअर्जदार यांनी अर्जदार यांच्यावर कौटूंबिक हिंसाचार केला असे अर्जदार शाबीत करते का ? | होकारार्थी. |
| २. | अर्जदार क्र.१ ते ४ हे गैरअर्जदारांकडून कौटूंबिक हिंसाचार कायदा कलम २० अन्वये मासीक पोटगी मिळण्यास पात्र आहेत काय ? असल्यास किती ? | अंशत: होकारार्थी. |
| ३. | अर्जदार क्र.१ ते ४ गैरअर्जदारांकडून कौटूंबिक हिंसाचार कायदा कलम २२ अन्वये नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहेत काय ? असल्यास किती ? | अंशत: होकारार्थी. |
| ४. | अर्जदार क्र.१ हीस तिच्या आईवडीलांनी दिलेले सर्व साहित्य, हुंडा व स्त्रीधन मिळण्यास पात्र आहे काय? | नकारार्थी |
| ५. | आदेश काय ? | अंतिम आदेशा प्रमाणे |

## कारणमिमांसा

०९. अर्जदाराने अर्जातील कथने सिध्द करण्यासाठी तिला स्वत:ला (निशाणी २१) कडे तपासले आहे. अर्जदाराने पुरावा बंद पुरसीस (निशाणी २३) कडे दाखल केला आहे. अर्जदाराने मालमत्ता दायीत्व प्रमाणपत्र (निशाणी १७) कडे दाखल केले आहे. अर्जदाराने काही कागदपत्र अभिलेखावर दाखल केली आहेत व सदर कागदपत्रांचा ऊहापोह पुढील विश्लेषणात आवश्यकता भासल्यास करण्यात येत आहे.

१०. गैरअर्जदार क्र.१, २, ४ व ७ ने अर्जावर त्याचे म्हणणे दाखल करण्याव्यतिरिक्त स्वत:ला व त्याच्या कथनाच्या पुष्ठयार्थ कोणालाही तपासलेले नाही. अगर त्याने कोणतेही कागदपत्र न्यायालयात दाखल केलेले नाही.

**मुद्दा क्रमांक १ करीता :-**

११. सदर मुद्दे हे परस्परांशी निगडीत असल्यामुळे व विश्लेषणाची पुनरार्वत्ती टाळण्यासाठी एकत्रीत विश्लेषीत करण्यात येत आहे. अर्जदाराने तिची सतरपासासणीचे शपथपत्र (निशाणी २१) वर दाखल केले असुन अर्जातील कथनांचा पुनरोच्चार केला आहे.

साक्षीदार क्र.१ कथन केले आहे की, तिला गैरअर्जदार क्र. ०१ कडुन तिन मुले आहेत. गैरअर्जदार क्र. ०१ ते ०७ यानी तिला एक वर्ष चांगले नांदवले त्यानंतर लग्नामध्ये मानपान केला नाही म्हणुन तिला अपमानीत करु लागले. ट्रान्सपोर्टचा व्यवसाय टाकण्यासाठी माहेराहुन दहा लाख रुपये घेऊन ये म्हणुन छळ करीत होते आणि तिला तिच्या अंगावरील पाच तोळे सोन्याचे दागिने काढुन घेऊन घरातुन हाकलुन दिले.

१२. अर्जदाराने तिच्या कथनाच्या पुष्ठयार्थ यादी (निशाणी क्र.०४) कडे अहमदपूर येथील प्रथम खबर अहवाल क्र. ४९/२०२२ ची प्रत दाखल केली आहे. सदर प्रथम खबरी प्रतचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की दिनांक ०९.०२.२०२२ रोजी अर्जदाराने आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता कलम ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये प्रथम खबर नोंद झाली आहे. कौटूंबिक प्रसंग अहवालाचे अवलोकन करता असे दिसुन येते की, अर्जदारांना बळजबरीने घराबाहेर काढले आहे तिला शिवीगाळ करुन तिला मारहाण केलेली आहे. अर्जदार पुढे असे कथन करते की गैरअर्जदार क्र. ०१ हा सौदी अरेबियाला काम करतो आणि वर्षाला दोन तीन महिण्याची सुट्टी घेऊन तो भारतामध्ये येतो. अर्जदाराने गैरअर्जदार दरमहा किंवा दरवर्षी किती उत्पन्न घेतो याचा खुलासा कुठेही केलेला नाही. गैरअर्जदार क्र. १ सौदी अरेबियाला काम करत होता तेंव्हा तो अर्जदार क्र. १ ते ४ साठी दरमहा १५,०००/- रुपये पाठवत होता. अर्जदाराचे असे कथन आहे की, अर्जदार क्र.१ ते ४ हे स्वत:चा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे.

१३. अर्जदार पुढे असे कथन करते की सध्याचा महागाईचा विचार करता तिला अर्जदार क्र. १ ते ४ यांच्याकरीता खाण्यापिण्याचा व कपडेलत्तेचा खर्च म्हणुन मासीक १०,०००/- (अक्षरी दहा हजार रुपये) पोटगी तसेच शारीरिक व मानसिक त्रासापोटी नुकसान भरपाई म्हणुन रक्कम रुपये १०,००,०००/- (अक्षरी दहा लाख रुपये) देण्यात यावी. अर्जदारांची सांभाळ करण्याची सर्वस्वी कायदेशीर जबाबदारी गैरअर्जदार क्र. ०१ यांची असताना देखील तो तिचा सांभाळ करत नाही. तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. ती स्वत:चा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे. औषधोपचार खानपाण इत्यादी खर्च आहे. गैरअर्जदारांचे वरील सर्व कृत्य कौटूंबीक हिंसाचाराचे कक्षात येतात त्यामुळे तिचे संरक्षण होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे गैरअर्जदाराने तिला घरगुती हिंसाचार करु नये म्हणून संरक्षणाचा आदेश पोटगी आदेश निवासाचे व नुकसान भरपाई आदेश यासाठी तिने प्रस्तुतचा

अर्ज दाखल केला आहे. गैरअजदाराने साक्षीदाराचा उलटतपास घेतलेला नाही त्यामुळे अर्जदाराचे म्हणणे हे आव्हानीत झालेले नाही.

१४. अर्जदाराच्या साक्षीपुराव्याचे अवलोकन केल्यानंतर असे दिसुन येते की, तिचा शारिरीक, आर्थिक आणि मानसिक छळ होत आहे हे सिध्द होत आहे. अर्जदाराने साक्षीपुराव्यावरुन गैरअर्जदार अर्जदाराचा आर्थिक आणि शारिरीक छळ केल्याची सिध्द होते. सदर बाबीवरुन गैरअर्जदाराने तिचा आर्थिक, शारिरीक आणि मानसिक घरगुती हिंसाचार केल्याची बाब सिध्द होते म्हणून मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ०२ करीता :-</u>**

१५. अर्जदार क्र.१ ते ४ हे आजरोजी भाग्यनगर, अहमदपूर येथे तिच्या पतीने बांधलेल्या घरामध्ये राहत आहेत. गैरअर्जदाराने सन २०१८ नंतर अर्जदारांची विचारपुस केलेली नाही किंवा कोणतीही आर्थिक मदत केलेली नाही. अर्जदारास उत्पन्नाचे साधन नाही. गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदाराच्या कथनानुसार सौदी अरेबिया येथे काम करतो. उलटपक्षी गैरअर्जदाराचे असे कथन आहे की, अर्जदार क्र. ०१ ही गैरअर्जदार क्र. ०१ याने घेतलेल्या घरामध्ये किराणा दुकानाचा व्यवसाय व कपडे शिलाईचे मशिन चालवते व सदर प्लॉटमध्ये चार रुम भाडयाने देऊन महिन्याला ८,०००/- ते १०,०००/- भाडे घेते.

१६. अर्जदार व गैरअर्जदार यांच्या दोघांच्या कथनांचे अवलोकन करता दोघांनीही त्यांच्या कथना संदर्भात कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. परंतु अर्जदार ही तिच्या मुलांसह सध्या गैरअर्जदारासोबत राहत नाही. अशा परिस्थिती अर्थातच तिच्या उदरनिर्वाहाचे औषधपाणी व इतर दैनंदिन गरजांची जबाबदारी ही तिच्यावर आलेली आहे. गैरअर्जदारांनी सन २०१८ पासुन अर्जदाराच्या व तिच्या मुलास कोणतीही आर्थिक मदत केल्याचे दिसुन येत नाही. अर्जदाराने गैरअर्जदारांच्या उत्पन्नाचा कागदोपत्री पुरावा सादर केला नसला तरीही अर्जदाराचे कथन गैरअर्जदाराने उलटतपासणी न घेतल्यामुळे विना आव्हानीत राहिले आहे. अर्जदार क्र.१ ते ४ यांच्या पालनपोषणाची शिक्षणाची कायदेशीर व नैतिक जबाबदारी ही सर्वस्वी गैरअर्जदार क्र.१ ची आहे.

१७. गैरअर्जदाराच्या व्यवहारावरुन त्यांनी अर्जदारास सांभाळण्यास दुर्लक्ष केल्याचे दिसुन येत आहे. अर्जदाराने गैरअर्जदाराकडे तिच्यासाठी दरमहा १०,०००/- (अक्षरी दहा

हजार रुपये) पोटगी मिळणेकामी विनंती केली आहे. गैरअर्जदार क्र.१ यांचे उत्पन्न व इतर जबाबदाऱ्या या बाबींचा विचार होणेदेखील तितकेच महत्वाचे आहे. अशा परिस्थितीत अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ कडून दरमहा रक्कम रुपये २,०००/- (अक्षरी दोन हजार रुपये) पोटगी मिळण्यास पात्र आहे. अर्जदाराने अर्ज दाखल केला तेंव्हा तिची मुले अज्ञान होती असे नमुद केले आहे. आज रोजी तिच्या मुलांचे वय किती आहे तसेच ते कोणते शिक्षण घेतात किंवा कोठे कामाला जातात याबाबत काहीही अभिलेखावर आणलेले नाही. सबब अर्जदार क्र. २ ते ४ बाबत कोणताही आदेश नाही. सबब मी मुद्दा क्र.२ चे निष्कर्ष अंशत: होकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्र.०३ करीता :-</u>**

१८. गैरअर्जदारांनी अर्जदाराचा घरगुती हिंसचार ही शारिरीक आर्थिक व मानसिक बाबतीत केल्याची बाब सिध्द झाली आहे. अर्जदार हि सध्या माहेरी राहते असे कोठेही नमुद केलेले नाही. अर्जदार ही गैरअर्जदाराने असे कथन केले आहे की, त्याने स्वत: खरेदी केलेल्या प्लॉटवर घर बांधुन तसेच किराणा दुकान चालवुन तिचा उदरनिर्वाह करत आहे. अर्जदार क्र.१ हिचा मानसिक व शारिरीक छळ केल्याबाबत गैरअर्जदार यांच्याकडून तिला नुकसान भरपाई म्हणून १०,००,०००/- (अक्षरी दहा लाख रुपये) मागितले आहे. अर्जदाराने अभिलेखावर तिला झालेल्या शारीरिक व मानसिक छळाबाबत कलम ४९८(अ) अंतर्गत प्रथम खबर दाखल केलेली आहे. यावरुन प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, तिचा शारीरिक व मानसिक छळ झालेला आहे. उलटपक्षी गैरअर्जदाराचे असे कथन आहे की, अर्जदाराने त्याला त्याच्या मालमत्तेतुन हाकलुन दिलेले आहे परंतु गैरअर्जदाराने त्याचे कथन अर्जदाराची उलटतपासणी घेऊन सिद्ध केलेला आहे. अर्जदाराने गैरअर्जदाराच्या उत्पन्नाचे कोणतेही कागदोपत्री पुरावे दिलेले नसल्याने अर्जदाराचा नुकसान भरपाईची मागणी ही अंशत: मंजुर होऊन ती नुकसान भरपाई म्हणून रक्कम रुपये ७,०००/- (अक्षरी सात हजार रुपये) मिळण्यास पात्र आहे. सबब मुद्दा क्र.३ चे निष्कर्ष अंशत: होकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्र.०४ करीता :-</u>**

१९. अर्जदार क्र. ०१ ने तिच्या अर्जात असे कथन केले आहे की, तिला तिच्या लग्नामध्ये तिच्या वडीलांनी स्त्रीधन म्हणुन एक तोळयाचे झुमके, दोन तोळयाचे गलसर, एक तोळयाचे मंगळसुत्र, चांदीची चैन ४० तोळयाची, पाच ग्रॅम सोन्याची नथनी घातली होती. परंतु

अर्जदाराने अभिलेखावर सदर दागिन्यांची कोणतीही पावती/कागदपत्रे दाखल केलेली नाही. सबब अर्जदार वरील नमुद स्त्रीधन मिळण्यास पात्र नाही. म्हणुन मुद्दा क्र. ०४ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे. सबब मुद्दा क्र.०५ करता खालील आदेश पारीत करते;

## आदेश

०१. अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

०२. गैरअर्जदार क्र.०१ याने अर्जदार क्र.०१ हिला प्रतिमहा रु.२,०००/- (अक्षरी दोन हजार रुपये) प्रमाणे प्रस्तुतचा अर्ज दाखल तारखेपासुन आर्थिक मदत (पोटगी) व वैद्यकिय उपचार द्यावयाची आहे.

०३. गैरअर्जदार क्र.०१ याने अर्जदार क्र.०१ ला नुकसान भरपाई म्हणून ७,०००/- (अक्षरी सात हजार रुपये) द्यावयाची आहे.

०४. गैरअर्जदार क्र.०१ ने अर्जदाराला कोणत्याही प्रकारे घरगुती हिंसाचार करु नये असा संरक्षणात्मक आदेश देण्यात येत आहे.

०५. अर्जदाराच्या इतर मागण्या नामंजूर करण्यात येत आहेत.

०६. सदर न्यायनिर्णयाची प्रत अर्जदार, गैरअर्जदार व संरक्षण अधिकारी, अहमदपूर यांना विना मोबदला देण्यात यावे.

(न्यायनिर्णय खुले न्यायालयात अधिघोषित असे)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by MEGHA CHANDRAKANT HASGE
Date: 2026.07.20 17:39:45 +0530

स्थळ – अहमदपूर.
दिनांक - २०.०७.२०२६.

( एम.सी. हासगे )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.०२), अहमदपूर.